MHWS100008502023

**सं.फौ.ख.क्र. ५०७/२०२३**

सरकार – वि – विवेक

नि. क्र. १७ वर पुढे सुरु

## न्यायनिर्णय

(दिनांक ०१/०७/२०२६ रोजी पारित)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७ व ३३८ तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४ नुसार शिक्षा पात्र गुन्ह्याकरिता अभियोगपक्षातर्फे दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | ०७/१२/२०२२ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | २६/१२/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Charge-sheet) | ११/०५/२०२३ |
| दोषारोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge/Particular) | ३१/०७/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक (Date of commencement of Evidence) | ०९/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक (Date on which Judgment is reserved) | युक्तीवाद ऐकल्यानंतर तात्काळ न्यायनिर्णय देण्यात आला. |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the Judgment) | ०१/०७/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of sentencing Order, if any) | – |

| अ.क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नाव (Name of accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of release on bail) | कलम (Offence charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentenced imposed) | न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विवेक मधुकर गीरी | अटक नाही. | ०१/०६/२०२३ | भा.दं.वि. कलम २७९, ३३७ व ३३८ तसेच मो.वा.का. कलम १८४ अन्वये | निर्दोष | – | – |

२. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.एम.एस.सुपारे आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. के. डी. चतरकर यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद, प्रकरणात दाखल तोंडी आणि कागदोपत्री पुरावा यांचा विचार करता माझ्यासमक्ष खालील मुद्दे प्रकरणाच्या निर्णयासाठी विचारार्थ आहेत. सदर मुद्यांवर कारणमिमांसेसह माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दिनांक ०७/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास वरदरी फाटा, औरंगाबाद ते नागपुर हायवे रोडवर, मौजा वरदरी, ता. मालेगांव, जि. वाशिम येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील पांढ–या रंगाची गाडी डस्टर क्र. एम. एच. ३० एएफ ५९४० ही गाडी मानवी जिवीतास धोका होईल अशा पद्धतीने, हयगयीने, निष्काळजीपणे भरधाव वेगाने तसेच रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे चालवून जखमी फिर्यादी वामन प्रल्हाद गजभार व जखमी रामभाऊ शंकर काळे जात असलेल्या मोटारसायकल क्र. एम. एच. ३७ ४१९२ या गाडीला जोरदार धडक देवून जखमी फिर्यादी वामन व जखमी रामभाऊ यांना गंभीर दुखापत केली होती काय ? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची सुटका. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र.१ व २ करिता

३. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एकूण २ साक्षीदार तपासले आहेत. साक्षीदार क्र.१ फिर्यादी वामन प्रल्हाद गजभार व साक्षीदार क्र.२ मंदा उर्फ नंदा वामन गजभार यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे.

४. साक्षीदार क्र.१ फिर्यादी वामन गजभार याने त्याच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, तो आरोपीला ओळखत नाही. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, जखमी रामभाऊ हा त्याचा नातेवाईक होता व त्याचा अंदाजे तीन महिन्यापूर्वी मृत्यु झालेला आहे. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, कथीत घटना कधी घडली होती, कुठे घडली होती व काय घडली होती याबाबत त्याला काहीही माहित नाही. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, तो व मयत रामभाऊ मोटारसायकलने मौजा येडशी येथे जात होते त्यावेळेस तो कुठे धडकला होता याबाबत त्याला काहीही माहित नाही.

फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, त्याने आरोपीविरुद्ध रागाच्या भरात फिर्याद दिली होती. फिर्यादीने जबानी रिपोर्ट नि. क्र. २५ व छापील प्रथम खबरी अहवाल नि. क्र. २६ यांच्यावरील सह्या मान्य केल्या; परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे कथन केले. फिर्यादीने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना फिर्यादीची उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली, परंतु फिर्यादीला उलटतपासात विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची फिर्यादीने नकारार्थी उत्तरे दिली. फिर्यादीने उलटतपासात त्याच्या जबानी रिपोर्टमधील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी का नमूद केला याचे कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले. फिर्यादीचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी नाकारला. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीने अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे सुद्धा निदर्शनास येते की, फिर्यादीने त्याच्या पुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही कथन केलेले नाही. सबब सदरील कारणास्तव फिर्यादीची साक्ष ग्राह्य धरता येत नाही.

५. साक्षीदार क्र.२ मंदा उर्फ नंदा गजभार हिने तिच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, ती आरोपीला ओळखत नाही. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, फिर्यादी तिचा पती आहे. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, जखमी रामभाऊ तिचा नातेवाईक होता तसेच त्याचा अंदाजे तीन महिन्यापूर्वी मृत्यु झालेला आहे. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, कथित घटना कधी घडली होती, कुठे घडली होती आणि काय घडली होती याबाबत तिला काहीही माहित नाही. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, पोलीसांनी तिचे बयान नोंदविले नव्हते. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना सदर साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली, परंतु सदर साक्षीदाराने उलटतपासात विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची सदर साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली. सदर साक्षीदाराने उलटतपासात तिच्या बयानामधील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी का नमूद केला याचे कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी नाकारला. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे सुद्धा निदर्शनास येते की, सदर साक्षीदाराने तिच्या पुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही कथन केलेले नाही. सबब सदरील कारणास्तव सदर साक्षीदाराची साक्ष ग्राह्य धरता येत नाही.

६. अभिलेखाची पडताळणी केली असता असे सुध्दा निदर्शनास येते की, फिर्यादी व आरोपीची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झालेली आहे, त्याप्रमाणे फिर्यादी व आरोपीने अभिलेखावर आपसातील समजपत्र नि.क्र.२४ दाखल केलेला आहे.

७. आरोपीच्या विधीज्ञांनी घटनास्थळ पंचनामा मान्य केले असल्यामुळे त्यास नि.क्र.२९ देण्यात आलेली आहे.

८. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र. १ जखमी फिर्यादी वामन गजभार याची साक्ष महत्वाची होती; परंतु फिर्यादीने अभियोगपक्षाला कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नाही. साक्षीदार क्र. २ मंदा उर्फ नंदा गजभार हिनेसुद्धा अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नाही. घटनास्थळ पंचनाम्यास नि.क्र.२९ देण्यात आले तरी घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर सिध्द झालेला नाही, तसेच कथित घटनास्थळ सिध्द झालेला नाही. जबानी रिपोर्ट नि.क्र.२५, छापील प्रथम खबरी अहवाल नि.क्र.२६ व घटनास्थळ पंचनामा नि.क्र. २९ यांना निशाणी क्रमांक देण्यात आले असले तरी आरोपीने गुन्हा केला याबाबत इतर कोणताही कागदोपत्री किंवा तोंडी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द करण्यास पात्र नाही, त्यामुळे आरोपी सुटण्यास पात्र आहे. वरील सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड विधान १८६० चे कलम २७९, ३३७ व ३३८ तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४ नुसार शिक्षा पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून सुटका करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपीने १५,०००/– रू. चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रक्कमेचा जामीन मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.07.01 16:37:31 +0530

दिनांकः ०१/०७/२०२६.

मोहम्मद वसीम अक्रम
पि. मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मालेगांव.

## सूची–I

### अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्षाचे साक्षीदारः–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१–नि.क्र.१७ वर | वामन प्रल्हाद गजभार | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२–नि.क्र.१७ वर | मंदा उर्फ नंदा वामन गजभार | साक्षीदार |

**ब. आरोपीचे साक्षीदार, असल्यासः–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यासः–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

### अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी

**अ. अभियोगपक्षः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २५ | जबानी रिपोर्ट |
| २ | २६ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३ | २९ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. आरोपीः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. मुद्देमालः–**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.07.01 16:37:43 +0530

दिनांकः ०१/०७/२०२६.

मोहम्मद वसीम अक्रम
पि. मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मालेगांव.

**CERTIFICATE**

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | T. R. Ugale (Grade III ) |
| Name of Court | **Shri. M. W. A. M. J. Sheaikh,**<br>C.J.J.D. & J.M.F.C., (Court No.1), Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 01/07/2026 |
| Judgment/Order signed by the PO on | 01/07/2026 |
| Judgment /Order uploaded on | 01/07/2026 |